पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
सांख्यिकी विभाग

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)



वाचा : १. महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शासन निर्णय क्र. अविवि-२०१५/प्र.क्र.२७५/का-५ दि.४ जुलै, २०१६.
२. दि. ०४ डिसेंबर, २०२० रोजीचे पत्र क्र. पुअहोसोविसो/सांख्यिकी/२०२०/९४८२.
३. दि. २४ मार्च २०२१ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीत ठराव क्र.३१.

## परिपत्रक

संलग्नित सर्व महाविद्यालय व प्रस्तुत विद्यापीठ सर्व शैक्षणिक संकुल यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, अल्पसंख्याक कल्याणाकरीता मा. पंतप्रधानांच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी अल्पसंख्याक सनियंत्रण समितीची व अल्पसंख्याक युवकांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक उन्नती व त्यांच्यामध्ये सकारात्मक बदल घडविण्याबाबत उपायोजना करण्याकामी शासनस्तरावरुन अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्कासाठी कार्यवाही करण्याकरिता दि. २४ मार्च, २०२१ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीत खालील प्रमाणे ठराव झालेले आहेत.

१. अल्पसंख्याकांच्या संख्येनुसार विद्यापीठे संलग्नित महाविद्यालयात स्थानिक पातळीवर बृहत आराखडा तयार केला जावा.
२. राष्ट्रीय सेवा योजनामधील अल्पसंख्यांक स्वयंसेकासाठी विद्यापीठाकडून १० गुणच देण्यात यावेत.
३. महाविद्यालयात व विद्यापीठ अधिविभाग येथे अल्पसंख्यांक संबंधी एक नोडल ऑफिसर नेमावा.
४. राष्ट्रीय सेवा योजनेमधील अल्पसंख्यांक स्वयंसेकासाठी विद्यापीठ स्तरीय उत्कृष्ठ स्वयंसेवक पुरस्कार देण्यात यावा.
५. राष्ट्रीय सेवा योजना मध्ये अल्पसंख्यांक स्वयंसेवकाचा एक वेगळा गट तयार करावा.
६. राष्ट्रीय सेवा योजना मध्ये अल्पसंख्यांक मुलांसाठी राखीव जागा ठेवण्यात याव्या.
७. अल्पसंख्यांकासाठी नोडल आफिसर, दोन शिक्षक, एक विद्यार्थी, व एक विद्यार्थीनी अशी समिती गठीत करावी.
८. अल्पसंख्यांक विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी आरोग्य शिबीर, संविधाना विषयी जागृती, जॉब फेअर व तसेच स्त्री अभ्यास केंद्र स्थापन करणे.
९. विद्यापीठ स्तरावर एक अल्पसंख्यांक स्वतंत्र विभाग असावा यामध्ये भाषिक, सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक अभ्यास या विभागाच्या माध्यमातुन केला जावा.
१०. सांस्कृतिक कार्यक्रम राबविणे, ज्यामध्ये अल्पसंख्यांक मुलांचे प्रमाण निम्यापेक्षा जास्त असेल. तसेच अप्लसंख्याक मुलांसाठी स्वतंत्रणे अल्पसंख्यांकांच्या समस्या विषयी Project, Survery इ. घेण्यात यावे.
११. महाविद्यालयीन स्तरावर शिष्यवृत्ती संदर्भात काही तक्रारी असल्यास सदर तक्रारी नोडल ऑफिसर कडे वर्ग करण्यात यावे.
१२. अल्पसंख्यांक पालकांची महाविद्यालय स्तरावर व विद्यापीठ अधिविभाग स्तरावर वर्षातुन दोन बैठका आयोजित कराव्यात.

उक्त ठरावाप्रमाणे संलग्नित सर्व महाविद्यालय व प्रस्तुत विद्यापीठ सर्व शैक्षणिक संकुलामध्ये योग्य ती कार्यवाही करून त्याबाबतचा अनुपालन अहवाल सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपीसह सांख्यिकी विभागाकडे सादर करावा.

(प्रा. डॉ. वि. भा. घुटे)
प्र. कुलसचिव

कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

जा.क्र. : पुअहोसोविसो/सांख्यिकी/2021/ 3153
दिनांक: 12 APR 2021

प्रती,
१. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय
२. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय
४. मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुल, प्रस्तुत विद्यापीठ
५. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
६. मा. संचालक, विद्यार्थी विकास, प्रस्तुत विद्यापीठ
७. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजन, प्रस्तुत विद्यापीठ

सदर परिपत्रक आपल्या शैक्षणिक संकुल / महाविद्यालयातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणावे.